# सटाणा आगाराची सटाणा-नाशिक (व्हाया खर्डे-कांचनबारी) बससेवा सुरु



सटाणा-नाशिक (कांचनबारी) बस सुरु झाल्याने वाहक चालकाचा कनकापूर येथे सत्कार करतांना सरपंच बारकू वाघ, उपसरपंच जगदीश शिंदे, संजय शिंदे, संजय जैन, बाळू शिंदे, योगेश शिंदे आदी. (छाया : सोमनाथ जगताप)

**देवळा ।** सटाणा आगाराची सटाणा- नाशिक (व्हाया खर्डे-कांचनबारी) बससेवा मंगळवार दि २४ पासून सुरु झाल्याने या मार्गावरील ग्रामस्थांनी चालक वाहकाचा सत्कार करून समाधान व्यक्त केले.

कांचनबारी मार्गे नाशिक बससेवा पूर्ववत सुरू करण्याबाबत गेल्या शनिवारी दि ७ रोजी वार्शी येथील अंकुश सोनवणे, कणकापूरचे उपसरपंच जगदीश शिंदे, खर्डे येथील प्रवीण देवरे, किरण जाधव यांनी जिल्हा वाहतूक अधिकारी कल्याणी ढगे यांना निवेदन दिले होते. याची दखल घेत एसटी महामंडळाच्या सटाणा आगाराने मंगळवार दि २४ पासून नाशिक बस सेवा सुरु केली. ही बस सटाण्याहून सकाळी सहा वाजता सुटणार असून ती देवळा, वाजगाव, खर्डे, कणकापूर, वार्शी, कांचने, धोडांबे, वडाळीभोई मार्गाने नाशिकला मार्गस्थ होईल. नाशिक हुन सकाळी साडे दहाला याच मार्गाने सटाणाकडे मार्गस्थ होईल. पूर्वी या मार्गावरून कळवण आगाराची बस सुरु होती. या ना त्या कारणाने ही बस गेल्या अनेक वर्षापासून बंद होती. यामुळे ग्रामस्थांची गैरसोय निर्माण झाल्याने या परिसरातील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली होती. विद्यार्थी, ग्रामस्थ यांची होणारी अडचण लक्षात घेता या मार्गावरून बस सेवा पूर्ववत सुरु करावी, यासाठी गेल्या पंधरा दिवसांपूर्वी अंकुश सोनवणे, जगदीश शिंदे, प्रवीण देवरे, किरण जाधव आदींनी जिल्हा वाहतूक अधिकारी कल्याणी ढगे यांची भेट घेऊन बसची मागणी केली. याची त्यांनी दखल घेत बस सेवा सुरु केली. या बसचे स्वागत करत चालक वाहकाचा या मार्गावरील खर्डे येथे माजी उपसरपंच सुनील जाधव, माधव ठोंबरे, अनिल पवार, भारत जगताप, संजय घुले, कनकापूर येथील सरपंच बारकू वाघ, उपसरपंच जगदीश शिंदे, संजय शिंदे, संजय जैन, बाळू शिंदे , योगेश शिंदे, मुकेश बर्वे आदींसह चांदवड तालुक्यातील धोडंबे गावातील ग्रामस्थांनी सत्कार करून समाधान व्यक्त केले.

या मार्गावर सटाणा आगाराने देवळा चांदवड तालुक्यातील गावातील नागरिकांसाठी सुरु केलेल्या बसला पहिल्याच दिवशी प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळून आल्याने ही बस आता रोज कायमस्वरूपी सकाळच्या सत्रात सुरु राहील. प्रवाशांचा प्रतिसाद बघता दुपारच्या फेरीसाठी देखील वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. तो मजूर झाल्यास दुपारची फेरी पण सुरु करण्यात येईल. **- आकाश बस्ते, सहायक वाहतूक निरीक्षक, सटाणा**

कांचनबारी मार्गे गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेली बस सटाणा आगाराने सुरु केल्याने नागरिकांची गैरसोय दूर झाली असून, नाशिकहुन सायंकाळी परतीच्या प्रवासासाठी पण या मार्गावर दूपारची बस सूरू करावी. यामुळे या मार्गावरील ग्रामस्थांना सोईचे होईल. **- जगदीश शिंदे, उपसरपंच, कणकापूर**

कांचनबारी ते कानमंडाळे रस्त्याची दुरावस्था झाली असून, वाहनधारकांनी नाराजी व्यक्त केली आहे. आमदार डॉ. राहुल आहेर यांनी याची दखल घेऊन या घाट रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, जेणेकरून बस व इतर वाहनांचे नुकसान होणार नाही. **- सुनील जाधव, माजी उपसरपंच, खर्डे**

## महत्त्वाचे

### डॉ. मुखर्जी यांचे कार्य समजून घेणे आवश्यक : प्रशांत जाधव

**नाशिक ।** अखंड भारतासाठी जीवदान देणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे कार्य समजून घेणे



आवश्यक असल्याचे भाजपा नाशिक महानगर माजी अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी सांगितले. ते आज वसंत स्मृती भाजप शहर कार्यालयात प्रखर राष्ट्रभक्त जनसंघाचे संस्थापक, काश्मिरी फुटीरवादाचे प्रखर विरोधक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. डॉ. मुखर्जी यांनी देशाच्या एकतेसाठी दाखविलेली निष्ठा, तत्वनिष्ठ राजकारण आणि आत्म बलिदान हे आजही भारतीय लोकशाही साठी प्रेरणादायी आहे, असे भाजप नेते व नाशिक महानगर स्थायी समितीचे माजी अध्यक्ष सुरेश पाटील यांनी सांगितले. नाशिक महानगर पर्यटन आघाडी अध्यक्ष व योग गुरु नंदकुमार देसाई यांनी सांगितले की, ३७० कलम मोदी सरकारने रद्द केले व नागरिकांनी त्यांचे कौतुक केले. डॉ. मुखर्जी यांनी देशभरात मोठी चळवळ उभी केली व त्या चळवळीस ७० वर्षांनी न्याय मिळाला. डॉ. मुखर्जी ही महान व्यक्ती होती. कार्यक्रमास भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रदीप पाटील, अनिल मोरे, डॉ. दिगंबर सनान्से, विजय देवरगावकर, रकीफ शेख, मदन निकम, विजय कुलकर्णी, सदा तायडे या मान्यवरांसह अनेक कार्यकर्ते डॉ. श्यामा प्रसाद यांस अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अबॅकस शिक्षणाचा उपक्रम फायदेशीर : आ. डॉ. आहेर




**देवळा ।** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीत वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून अबॅकस सारख्या शिक्षणाचा उपक्रम विद्यार्थ्यांना भविष्यात फायदेशीर ठरणारा असून, पालकांनी आपल्या मुलांसाठी कमी खर्चात होणाऱ्या या अभ्यासक्रमासाठी झोकून घ्यावे असे प्रतिपादन आमदार डॉ. राहुल आहेर यांनी आज येथे केले. तालुक्यातील माळवाडी येथे सोमवारी दि १६ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना अबॅकस किट वाटप व प्रशिक्षण उपक्रमाचा शुभारंभ आमदार डॉ राहुल आहेर यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी सतिष बच्छाव, विस्तार अधिकारी किरण विसावे उपस्थित होते.

माळवाडीचे उपसरपंच मयूर बागुल व सटवाई वाडीचे लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत आहेर यांनी आमदार डॉ. आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वखर्चाने अबॅकस उपक्रम राबविला असून या माध्यमातून पुढील चार वर्षे या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सदर उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. यात प्रामुख्याने मुलांच्या एकाग्रतेत वाढ, स्मरण क्षमतेत वाढ, मेंदूचा विकास, वाचन व लिखाणाची गती, सर्वांगीण विकास तसेच वैचारिक क्षमतेत वाढ होण्यासाठी मदत होणार असल्याने या उपक्रमाचे आ. आहेर यांनी यावेळी कौतुक केले. याचा आदर्श देखील इतर गावांनी घ्यावा असे सांगितले. याप्रसंगी अबॅकसचे शिक्षक हेमलता उंबरकर व योगेश उंबरकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रशांत देवरे, डॉ. चव्हाण, प्रवीण गांगुर्डे, जीभाऊ शेवाळे, दावल भदाणे, विकास आहेर,ताराचंद बागुल, ग्रामसेवक देवरे आदींसह शिक्षक, दोन्ही गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. आभार उपसरपंच मयूर बागुल यांनी मानले.

### सर्वच शाळांत हा उपक्रम राबविण्याचा मानस

देवळा तालुक्यात विविध शैक्षणिक उपक्रमांची रेलचेल आहे.परंतु नियमित उपक्रमां व्यतिरिक्त नावीन्यपूर्ण उपक्रमाची आवश्यकता अबॅकस ह्या उपक्रमाने पूर्ण होत असून देवळा तालुक्यातील माळवाडी आणि सटवाईवाडी या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये जिल्ह्यातून प्रथमच राबविण्यात येत आहे. यासाठीच आमदार डॉ. राहुल आहेर यांचे सहकार्यातून आगामी काळात तालुक्यातील सर्वच शाळांत हा उपक्रम राबविण्याचा मानस आहे.
**- सतीश बच्छाव, गटशिक्षणाधिकारी**

# डॉ. मुखर्जी यांचे जीवन राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्र उभारण्यासाठी समर्पित : चंद्रात्रे




**नाशिक ।** डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे जीवन राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्र उभारण्यासाठी समर्पित होते असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक व बौध्दिक प्रमुख नंदकिशोर चंद्रात्रे यांनी केले. ते भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होते.यावेळी व्यासपीठावर भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनिल केदार, मा.जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, ज्येष्ठ नेते विजय साने, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे, सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, अ‍ॅड.श्याम बडोदे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनिल केदार,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, बौध्दिक प्रमुख व ज्येष्ठ स्वयंसेवक नंदकिशोर चंद्रात्रे यांनी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर आपल्या व्याख्यानातून पुढे म्हणाले की सर्व भारतीयांना गर्व वाटावा असे घोष वाक्ये एक देश दो निशान, दो प्रधान... नही चलेंगे अशी भारतीयांच्या मनात भावना रुजविनारे डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी होते. राष्ट्रप्रेम वाढीस लागावे म्हणून त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी वयाच्या ३३ व्या वर्षी म्हणजे १९३४ ते १९३८ या काळात कुलपतीपद भुषविले. त्यांचा राजकारणातील मार्ग व जीवनक्रम अतिषय खडतर होता.१९२४ ला वडिलांचे निधन,११ वर्षाच्या संसारानंतर पत्नीचे निधन, १९४१ ते १९४२ या कालावधीत बंगाल प्रांताचे वित्त मंत्री म्हणून कार्यकाळ बघितला, त्यांनी १९५० ला आपल्या उदयोगमंत्री पदाचा राजीनामा देत राष्ट्रवादी विचारसरणीच्या राजकिय पक्ष म्हणून २१ ऑक्टोबर १९५१ रोजी जनसंघाची स्थापना केली व त्यातुनच त्यांनी खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेची बिजे रोवले. यावेळी नंदकिशोर चंद्रात्रे यांनी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या आयुष्यातील अनेक खडतर प्रसंगांवर आपले मत मांडले व काश्मिर येथे जात असतांना त्यांच्याकडे परवाना नसल्यामुळे त्यांना काश्मिरच्या हद्दीत अटक करण्यात आली. जेल मध्ये असतांना त्यांचा संशयास्पद मृत्यु झाला म्हणूनच भारतीय जनता पार्टी २३ जून हा बलिदान दिन म्हणून मानते व यादिवशी देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जाते. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विजय साने यांनी कार्यकर्त्यांनी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जीवनपट घरोघरी पोहचवावा असे प्रतिपादन केले. तसेच आपल्या प्रास्ताविक पर भाषणातून सुनिल केदार यांनी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी हे देश प्रेम वाढीस लागावे म्हणून त्यांनी आपले उभे आयुष्य देशासाठी वेचले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहर पदाधिकारी, मंडल पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री गजानन पतसंस्थेच्या व्हा. चेअरमनपदी येवला; जनसंपर्क संचालकपदी संजय महाजन बिनविरोध



**कळवण ।** कळवण तालुक्यातील सहकार क्षेत्रात अग्रेसर समजल्या जाणाऱ्या श्री. गजानन ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या व्हा. चेअरमनपदी सुरेश गंगाधर येवला यांची तर जनसंपर्क संचालकपदी संजय काशिनाथ महाजन यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेच्या व्हा. चेअरमन पदाचीं निवडणूक संस्थेचे संस्थापक गजानन अण्णा सोनजे यांच्या नेतृत्वाखाली बिनविरोध पार पडली.यावेळी संस्थेचे माजी व्हा.चेअरमन प्रमोद देवघरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.नूतन व्हा. चेअरमन पदाच्या निवडीसाठी संस्थेच्या कार्यालयात अध्याशी अधिकारी तथा सहाय्यक सहकार अधिकारी वाय. एन. कराटे यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली होती. व्हा. चेअरमनपदासाठी सुरेश येवला यांनी एकमेव उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यावर सुचक म्हणून प्रमोद देवघरे यांनी तर अनुमोदन म्हणून संजय महाजन यांनी स्वाक्षरी केली. निर्धारित वेळेत सुरेश येवला यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने अध्याशी अधिकारी वाय. एन.कराटे यांनी बिनविरोध निवडिची घोषणा केली. यावेळी संस्थापक गजानन अण्णा सोनजे, चेअरमन यतीन सोनजे, एकनाथ वालखडे, प्रमोद देवघरे, निंबा नेरकर, प्रल्हाद दुसाने, रवींद्र कोठावदे, सुधाकर खैरनार, कुशल सोनजे, किशोर वाडेकर, नामदेव भोये, अलका सोनजे, सुनीता सोनजे तसेंच व्यवस्थापक मिलिंद जुन्नरे, शरद गांगुर्डे, संदीप जगताप, अमोल अलई आदीनें नवनिर्वाचित व्हा, चेअरमन सुरेश येवला व जनसपंर्क संचालक संजय महाजन यांचे अभिनंदन केले.

# गुणवंतांचा गौरव हा शाळेचा खरा सन्मान : कापसे



नासाका विद्यालयातील विशेष सत्कार सोहळ्याप्रसंगी गुणवंतांसह ज्येष्ठ कामगार नेते प्रशांत कापसे, कवी शरद आडके, संदीप आडके, मुख्याध्यापक अरुण पगार यांच्यासह पालक, शिक्षक-कर्मचारी.

**नाशिकरोड ।** प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात दहावीची परीक्षा त्याच्या भविष्याला दिशा देत असते. या परीक्षेत उत्तुंग यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणे हे प्रत्येक शाळेचे कर्तव्य आहे. कारण अशा गुणवंतांचा गौरव म्हणजे शाळेचा खरा सन्मान असतो, असे उदगार ज्येष्ठ कामगार नेते प्रशांत कापसे यांनी काढले.

पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या विशेष सत्कार सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. मंचावर सुप्रसिद्ध कवी आणि नानेगावच्या श्रीमंत श्री नर्सरीचे संचालक शरद आडके, मुख्याध्यापक अरुण पगार, सामाजिक कार्यकर्ते संदीप आडके यांच्यासह गुणवंत विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सेमी मराठी माध्यमात गुणानुक्रमे प्रथम ते पाचवा क्रमांकप्राप्त प्रथम वेदिका भाऊसाहेब शिंदे, तनिष्का संजय आडके, गणेश मनोहर सानप, सुजल संजय शिंदे, सारंग नवनाथ मुंजे यांच्यासह मराठी माध्यमातून यशस्वी झालेल्या ऋतुजा विजय आडके, श्रावणी संतोष चौधरी, गायत्री सोमनाथ कांगणे, ऋतुजा सोमनाथ ठुबे, गणेश रामदास विंचू यांना सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले.

शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन तर सांस्कृतिक विभागप्रमुख कैलास लहांगे यांनी आभार मानले.

# वाढता वाढता वाढे गोदावरीचे प्रदूषण...



गोदा घाटानजीक असलेल्या ड्रेनेजच्या ढाप्यांमधून दूषित पाणी ओव्हर फ्लो होऊन असे थेट गोदापात्रात मिसळत असल्याचे अप्रिय चित्र दिसत आहे.

**नाशिक ।** दक्षिण गंगोत्री गोदावरी नदीच्या प्रदूषणाची मात्रा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच आहे. गटारी, नाल्यांचे दूषित पाणी विविध मार्गांनी गोदावरीत मिसळत असून, भाविकांच्या नशिबी दूषित, अशुद्ध जलाचा वनवास कायम आहे. विशेष म्हणजे गोदावरीच्या पात्रालगत असलेल्या ड्रेनेजच्या ढाप्यांमधून दूषित पाणी सर्रासपणे गोदापात्रात मिसळत आहे.

शहरात सद्या गेल्या आठ पंधरा दिवसांपासून जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे शहरात अनेक ठिकाणी ड्रेनेज ओव्हर फ्लो होऊन वाहत असल्याचे चित्र आहे. हे दूषित पाणी गोदावरीला जाऊन मिळत असल्याने गोदावरी दुथडी भरून वाहत असली तरी प्रदूषणाची समस्या "जैसे थे"च आहे. केंद्रासह राज्य सरकारने गोदावरी निर्मळ करण्यासाठी हजारो कोटींचा कृती आराखडा तयार केला आहे. येऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पावन कालावधीत गोदावरीचे अविरतपणे वाहते आणि शुद्ध जल उपलब्ध व्हावे हीच समस्त भाविकांची मनीषा आहे. कृती आराखडानुसार कामे होतीलच पण तोपर्यंत किमान नाले व गटारींचे, ड्रेनेजचे दूषित पाणी गोदपात्रात मिसळणारे नाही एवढी काळजी घेतली तरी खूप झाले.

# योगतज्ज्ञ मणिभाई देसाई योग पुरस्कार वितरण



**नाशिक ।** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योग आणि निसर्ग विद्या निकेतन, महाराष्ट्र योग परिषद या संस्थांच्या वतीने ज्येष्ठ योगतज्ज्ञ मणिभाई देसाई योग पुरस्काराचे वितरण संपन्न झाले.

होम्स् पार्क साईड गृह प्रकल्पाच्या प्रांगणात गिरणा गौरव प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या शानदार सोहळ्यास मुक्त विद्यापीठाच्या आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे संचालक डॉ.जयदीप निकम, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य प्र.द.कुलकर्णी, होम्स् पार्क साईड ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ.एन.आर.फेगडे, ज्येष्ठ शिक्षक नेते प्राचार्य संजय चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ योगतज्ज्ञ प्र.द.कुलकर्णी, सीमा ठाकरे, प्रा.डॉ.मीनाक्षी गवळी, वैशाली रामपूरकर, हिराबाई अहिरे, प्रा. राहुल येवला, योगगुरू जीवराम गावले, किशोर भंडारी, शरद दंडगव्हाळ, कविता गायकवाड यांना योगतज्ज्ञ मणिभाई देसाई योग पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थींच्या वतीने प्रा. डॉ.मीनाक्षी गवळी यांनी सत्काराला उत्तर दिले. मान्यवरांनी भाषणात योगाचे जीवनातील स्थान आणि महत्त्व सांगून निरोगी आरोग्यासाठी योगाची आवश्यकता असल्याचे विचार मांडले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

डॉ.तस्मीना शेख यांनी स्वागतपद्य सादर केले. संयोजक योगाचार्य अशोक पाटील यांनी प्रास्ताविक तर प्राचार्य यू.के. अहिरे यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कवी रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## महत्त्वाचे

### सिडको चंदन चोरीचा प्रकार उघड; दोन झाडांची कत्तल

**नाशिक ।** सिडको सिंहस्थ नगर परिसरातील जलतरण तलाव येथील गार्डनमधील दोन चंदनाची



झाडे अज्ञात चंदन चोरांनी रात्रीच्या अंधारात कापून त्यातील चंदन चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते, वृक्षप्रेमी सतीश अस्वरे यांनी नाशिक महानगरपालिकेने या गार्डनमध्ये कायमस्वरूपी सुरक्षा रक्षकाची नेमणूक करून अशा प्रकारची दुर्लभ वृक्ष तसंच सरकारी मालमत्तेचे रक्षण करण्याची मागणी केली आहे.

### रायुकाँचे दत्तू पवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नांदगाव ।** नांदगाव तालुक्याचे आमदार सुहास कांदे यांच्या उपस्थितीत नांदगाव येथे राष्ट्रवादी



काँग्रेसचे उपजिल्हाध्यक्ष दत्तू पवार यांच्यासह पदाधिकारी तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. नांदगाव तालुक्यातील जोंधळवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हाध्यक्ष दत्तू पवार, माजी सरपंच नामदेव काळे, सोसायटीचे चेअरमन प्रकाश डगळे, दत्तू काळे, उपसरपंच दत्तू काळे, सोसायटीचे संचालक प्रशांत डगळे, शिवसेना (उबाठा) गटाचे शाखाप्रमुख संजय काळे, यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी संख्येने उपस्थित होते.

### पिंपळगाव मोर वि.का. संस्थेच्या चेअरमनपदी काळे

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील बहुचर्चित व प्रतिष्ठेच्या पिंपळगाव मोर विविध



कार्यकारी विकास सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी पंढरीनाथ काळे यांची तर व्हाईस चेअरमनपदी रामनाथ बेंडकोळी यांची बिनविरोध निवड झाली. गत महिन्यात सार्वत्रिक निवडणूक झाली होती. निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना सौंदाणे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २० जून रोजी पहिली मिटिंग घेण्यात आली. निवड प्रक्रियेदरम्यान विहित वेळेत चेअरमनपदासाठी पंढरीनाथ झुंगा काळे व व्हा. चेअरमनपदासाठी रामनाथ रघुनाथ बेंडकोळी यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने दोघंही पदाची बिनविरोध निवड झाल्याचे अर्चना सौंदाणे यांनी जाहीर केले. अधिकृत घोषणेनंतर उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट व घोषणा देण्यात आल्या. निवड प्रक्रियेत फत्तु बेंडकोळी, रघुनाथ कदम, अशोक काळे, हौशीराम काळे, रामदास विठोबा काळे, धनराज बेंडकोळी, रामदास संतू काळे, बाळू मेंगाळ, पार्वताबाई जाखेरे, यशोदा पिंगळे आदी संचालकांनी सहभाग घेतला.

### नांदूर मध्यमेश्वरला अहिल्या सृष्टी स्मारक तयार व्हावे : डॉ. महात्मे

**एकलहरे ।** नांदूरमध्यमेश्वर ता. निफाड येथे असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वाड्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, त्या वाड्यात श्रीराम मंदिराची स्थापना संपूर्ण



गावासाठी असावी तसेच अहिल्यादेवींचा पुतळा उभारून स्मारक तयार व्हावे, अशी भूमिका माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी मांडली आहे. वाड्याच्या जतन, संवर्धन आणि संरक्षणासाठी आपण थेट मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.डॉ. विकास महात्मे अहिल्यादेवी जयंतीनिमित्त होळकर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर डॉ. महात्मे यांनी नांदूरमध्यमेश्वर येथील होळकरवाड्याला भेट दिली, या वाड्याच्या भिंती तोडल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव सोहळा समिती, नाशिककडून करण्यात आल्या होत्या. समितीचे संस्थापक अध्यक्ष समाधान बागल यांनी यासंदर्भात आक्रमक भूमिका घेतली होती. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर, गणेश धात्रक, समाधान बागल, शरद शिंदे, भाऊसाहेब भवर, गोरख कांदळकर, सनी फसाठे उपस्थित होते.

# शेतकरी, नागरिकांना भरपूर प्रमाणात वीज उपलब्ध होणार : छगन भुजबळ

**विंचूर ।** शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी व वीज ही महत्त्वाची गरज आहे. पाऊस सुरू झाल्यामुळे खरिप हंगामाची कामे सुरू झाली आहे. महावितरणच्या माध्यमातून आज कार्यान्वित झालेल्या रोहित्रांच्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांना मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे.

निफाड तालुक्यातील देवगाव, कानळद, मरळगोई, खडकमाळेगाव व विंचूर येथे महावितरणच्या विविध विकास कामांचे भूमीपूजन व लोकर्पण मंत्री भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, महावितरणचे कार्यकारी अभियंता के. व्हि. काळुमाळी, उपकार्यकारी अभियंता दत्तात्रय पुंडे, सहाय्यक अभियंता किरण काकड, दिव्या पवार, निकम, भालेराव, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, लासलगाव बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर जगताप, संचालक डॉ.श्रीकांत आवारे, संचालक तानाजी आंधळे, भाऊसाहेब बोचरे, शिवाजी सुपनर, विनोद जोशी, सरपंच दत्तूपंत डुकरे, सरपंच बाळासाहेब पुंड, सरपंच दत्तात्रय घोटेकर, सरपंच संदीप गारे, सरपंच सचिन दरेकर, सरपंच संजय घायाळ, दत्तात्रय रायते, गोरख शिंदे, सुरेखा नागरे, मंगेश गवळी, अरुण घुगे, तुकाराम गांगुर्डे, अशोक नागरे, पांडुरंग राऊत, विलास गोरे, सुनील राऊत, बालेश जाधव, योगेश साबळे, बबन शिंदे, राहुल डुंबरे, अनिल सोनवणे, किशोर जेऊघाले, माधव जगताप, शिवाजी जाधव, प्रकाश



घोटेकर, राहुल आहेर, भाऊसाहेब पारखे, मिलिंद पगारे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. महावितरणच्या आरडीएसएस लॉस रीडक्शन योजनेअंतर्गत एबीकेबल टाकण्यात येऊन कंडक्टर बदलणे, अपग्रेड करणे ही कामे करण्यात येत आहे. त्यानंतर रोहीत्रांवरील अनधिकृत भार कमी होऊन रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण कमी होणार आहे.

निफाड तालुक्यातील खडक माळेगाव विद्युत उपकेंद्रात अतिरिक्त ५ एमव्हीए व मरळगोई विद्युत उपकेंद्रात अतिरिक्त ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र आज कार्यान्वित करण्यात आले आहे. लवकरच मतदारसंघातील संपूर्ण विद्युत केंद्रांचे बळकटीकरण होऊन ग्राहकांना मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होणार असल्याचे कार्यकारी अभियंता काळुमाळी यांनी प्रास्ताविकात सांगितले. मंत्री भुजबळ यांच्या हस्ते या कामांचे भूमीपूजन व लोकार्पण झाले. देवगाव येथे ५ एम.व्ही.ए.चे विद्युत उपकेंद्रामध्ये रोहित्राची क्षमता १० एम.व्ही.ए करणे या कामाचे भुमीपूजन. (र.रु.१७८.०४ लक्ष) कानळद येथे ५ एम.व्ही.ए.चे विद्युत उपकेंद्रामध्ये रोहित्राची क्षमता १० एम व्ही ए करणे कामाचे भुमीपूजन. (र.रु. १४२.५७लक्ष) मरळगोई येथे कृषी आकस्मितता निधीमधुन ५ एम व्ही ज चा अतिरिक्तं रोहीत्र बसविणे उद्घाटन (र.रु. १५०.५२ लक्ष) (मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना) खडकमाळेगांव येथे कृषी आकस्मितता निधीमधुन ५ एम.व्हि.ए. चा अतिरिक्ता रोहीत्र बसविणे उद्घाटन. (र.रु. १३९.६९ लक्ष) (मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना) विंचूर येथे कृषी आकस्मितता निधीमधुन ५ एम.व्हि.ए. चा अतिरिक्तष रोहीत्र बसविणे कामाचे भुमीपूजन. (र.रु. १२८.२७ लक्ष) (मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना)

## कापडी पिशवी वेंडिंग मशीनचे उद्‌घाटन

**नाशिक मनपा, रोटरी क्लब ऑफ गोदावरीचा अभिनव उपक्रम**




**नाशिक ।** शहरात पर्यावरण संवर्धनाची दिशा देणाऱ्या एका अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आकाशवाणी टॉवरजवळील भाजी बाजार येथे करण्यात आला. नाशिक महापालिका आणि रोटरी क्लब ऑफ गोदावरी यांच्या संयुक्त विद्यमाने कापडी पिशवीच्या वेंडिंग मशीनचे उदघाटन महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या हस्ते झाले.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात प्लास्टिकमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, भाजी बाजार व विविध बाजारपेठांमध्ये पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा वापर वाढविण्यावर भर दिला जात आहे. या प्रसंगी बोलताना आयुक्त मनीषा खत्री यांनी, "प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर ही काळाची गरज आहे. प्रत्येक नाशिककराने पर्यावरण पूरक पर्याय स्वीकारल्यास गोदावरी नदीचे व शहराचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल," असे आवाहन केले. रोटरी क्लब ऑफ गोदावरीच्या अध्यक्षा डॉ. मीनल पलोड यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, "या वेंडिंग मशीनद्वारे नागरिक सहजरीत्या कापडी पिशव्या कमी पैशात विकत घेऊ शकतात. लवकरच नाशिकमधील इतर भागांमध्येही हा उपक्रम राबविला जाणार आहे. या प्रसंगी क्लबचे प्रकल्प समन्वयक बसवराज अंगाडी, सचिव डॉ. मेघा नाठे, डॉ. प्रणिता गुजराती, इंजिनिअर महेश बागुल, सोनाली नेरकर,भूषण पाटकर, ओंकार महाले, मधुकर फटांगरे तसेच रोटरी क्लब गोदावरीचे सदस्य व शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, संदेश शिंदे, प्रशांत बोरसे, पालवे व जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम शाश्वत पर्यावरण रक्षणासाठी एक सकारात्मक पाऊल असून, यामुळे नाशिक शहराच्या स्वच्छता व प्लास्टिकमुक्ततेच्या उद्दिष्टांना निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ देणार पर्यावरण मित्र पुरस्कार

**शोकसभेत निसर्गप्रेमी, साहित्यप्रेमींकडून अभिवादन**

**नाशिक ।** सोलापूरच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले, नाशिकच्या १९८५ ला पार पडलेल्या सहाव्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष ,वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ नोकरी करीत तब्बल ६५ वर्षे जंगलात काढणारे अरण्यऋषीं मारुती चितमपल्ली यांचे सोलापूरमध्ये निधन झाले.

तब्बल चार दशकांहून अधिक काळ त्यांनी निसर्ग संशोधन लेखन आणि संवर्धनासाठी समर्पित केला. मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पक्षीमित्र संघटनेतर्फे डिसुझा कॉलनीमधील प्रौढ मित्र मंडळ सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शोकसभेत बोलताना नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा. आनंद बोरा यांनी मारुती चितमपल्ली यांच्या स्मरणार्थ नेचर क्लब ऑफ




नाशिकतर्फे दरवर्षी वन विभागातील वन मजूर, गाईड, वन कर्मचारी यांना पर्यावरण मित्र पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा केली.

पक्षीमित्र डॉ.अनिल माळी यांनी मारुती चितमपल्ली यांच्या आठवणी सांगताना ते म्हणाले की अरण्यऋषींनी नाशिकमध्ये कोणती देशी वृक्ष लावावी याची यादीच तयार केली होती. अंजली जाखडी यांनी सूत्रसंचालन केले. पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष मधुकर जगताप, किशोर चव्हाण, भगीरथ घोटेकर, लहू डफळे, उमेश कुमार नागरे, मनीष गोडबोले, संदीप रावळे, भगवान क्षेमकल्याणी,अनंत सरोदे, रवींद्र वामनाचार्य, संदीप सोनवणे, अनिल तुपे आदींसह पक्षिमित्र, साहित्यिक उपस्थित होते.

## नाशिकच्या सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर

**नाशिक ।** साहित्यकणा फाऊंडेशन व भावसुमन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील साहित्यिकांना दरवर्षी पुरस्कार दिले जातात. २०२५ यावर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य साधना पुरस्कारासाठी नाशिक येथील कवयित्री सीमाराणी बागुल यांना साहित्य साधना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



२०२२ मध्ये पहिला कवितासंग्रह जीवनाची शाळा याचे प्रकाशन कोपरगाव येथे ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दहा मे 2025 रोजी नारायण सुर्वे कवी कट्टा येथे गर्भारलेल्या मातीतून या दुसऱ्या कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कोळगावकर ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन झालेले आहे. बागुल यांच्या साहित्यिक कार्याची दखल गर्भारलेल्या मातीतून या काव्यसंग्रहाला हा पुरस्कार दिला जाणार आहे. २९ जून रोजी सकाळी दहा वाजता कॅनडा कॉर्नर येथील समर्थ मंगल कार्यालयात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## आणीबाणीमध्ये कारावास भोगलेल्या व्यक्तींचा गौरव

**जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते हृद्य सत्कार**

**नाशिक ।** देशात आणीबाणी लागू झालेल्या घटनेस आज ५० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त आणीबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्तींचा जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते जिल्हा प्रशासनाच्या वतीने गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात बुधवारी सकाळी हा कार्यक्रम झाला. जिल्हाधिकारी शर्मा यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, जिल्हा माहिती अधिकारी गोपाळ साळुंखे, नायब तहसीलदार नरेंद्र जगताप, लोकतंत्र सेनानी संघाचे अध्यक्ष एकनाथ शेटे, उपाध्यक्ष सुरेश सायखेडकर, रमाकांत कुलकर्णी यांच्यासह आणीबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्ती आणि त्यांचे वारस मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी शर्मा यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे गौरवपत्र, गुलाबपुष्प देवून कारावास भोगलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाची पाहणी जिल्हाधिकारी शशर्मा यांच्यासह मान्यवरांनी केली. जिल्हाधिकारी म्हणाले की, जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून आणीबाणीत कारावास सोसाव्या लागलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येत आहे. अशा प्रकारचे उपक्रम भारतीय लोकशाही





### जिल्हाधिकारी यांची संवेदनशीलता

आजच्या या सत्कार सोहळ्यास धुंडिराज होनप यांच्यासह अन्य एक वयोवृद्ध व्यक्ती जिल्हाधिकारी कार्यालयातील तळमजल्यावरील मुख्यमंत्री सहायता कक्ष येथे थांबले होते. जिल्हाधिकारी शर्मा यांनी तेथे जाऊन होनप यांचा सत्कार केला.

आणखी सक्षम आणि बळकट करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. लोकतंत्र सेनानी संघाने केलेल्या मागण्यांबाबत राज्य शासनाला अवगत करण्यात येईल. तसेच राज्य शासनाने आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या व्यक्तींच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याचे सांगितले. श्री. शेटे, भानुदास येवला, दिनकर देशमुख, जयश्री कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी, रमाकांत भावसार, दामोदर गौरकर आदींनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, आणीबाणी अचानक जाहीर झाली. लोकशाहीसाठी अनेकांनी सत्याग्रह केला. या कालावधीत अनेकांना तुरुंगात डांबण्यात आले. भारतीय राज्य घटनेचा दुरुपयोग झाला. त्यानंतर जनमत विरोधात गेल्यानंतर १९७७ मध्ये आणीबाणी मागे घेण्यात येऊन लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घोषित झाल्याचे त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी वाघ यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, देशात आणीबाणी लागू झाल्याच्या घटनेस आज ५० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे आणीबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्तींचा व त्यांच्या वारसांचा सत्कार करण्यात येत आहे. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून आणीबाणीवर आधारित छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. जिल्हा माहिती अधिकारी श्री. साळुंखे यांनी आभार मानले.

## नाशिकच्या भूमीत घडलेला तरुण मेकअप आर्टिस्ट : ॲडी ऊर्फ आदित्य पवार

मराठी-हिंदी रंगभूमी असो! मालिका, लघुचित्रपट, चित्रपट, अल्बम साँग, जाहिरात असो की अजून त्याच्याशी निगडीत काही बाबी असो! त्यामध्ये मेकअप हा महत्वाचा भाग असतो. रंगभूषाकार, चेहरा रंगविणारा अर्थात मेकअप मॅन ही जबाबदारी सांभाळत असतो. मेकअप मॅन म्हणजे चेहरा रंगविणारा असा ढोबळ मानाने मराठीत अर्थ सांगता येईल. या क्षेत्रात काम करणारी, करिअर घडविणारी-करणारी गुणी माणसं असतात, आहेत. रंगमंचामागे, पडद्यामागे ही मंडळी आपल्या कलेने दिग्दर्शकाला अपेक्षित असलेल्या भूमिकेनुसार कलावंतांचा मेकअप करीत असतात. अशाच मेकअप मन, मेकअप आर्टिस्ट यांच्यापैकी नाशिक येथील ॲडी उर्फ आदित्य पवार हे यशस्वी, तरुण मेकअप आर्टिस्ट उर्फ मेकअप मॅन आहेत.



सांस्कृतिक

पूजा भावसार

९३२६९१४७०१

मूळचे नाशिकचेच असलेले आदित्य पवार यांनी शिक्षणाचे धडे घेतल्यानंतर आवडीतून हे मेकअप क्षेत्र निवडले. सुरुवातीला त्यांनी अभिनय क्षेत्रातही प्रयत्न करून पाहिला; पण त्यांना त्यात यश मिळाले नाही. मग त्यांनी माणसांचा चेहरा रंगविण्याच्या अर्थात मेकअप क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला अन त्या दृष्टीने अथक प्रयत्न, मेहनत, चिकाटी आणि संयम यांची सांगड जुळवत या क्षेत्रात मस्त जम जमविला. ज्येष्ठ मेकअप मॅन ललित कुलकर्णी यांचे सहाय्यक (असिस्टंट) म्हणून आदित्यने काम सुरू केले. सुरुवातीला चार-पाच वर्षे कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली काम केल्यावर आदित्य यांनी स्वबळावर हे काम सुरू केले अन





त्यात त्यांनी परिपूर्णता प्राप्त केली. मेकअप क्षेत्रात ते ॲडी या टोपण नावानेच प्रसिद्ध आहेत. शिर्डी येथे एका सीडी कॅसेट चित्रपटात मेकअपचे त्यांनी असिस्टंट म्हणून काम केले. सुमारे १०० मराठी चित्रपटातआदित्यने असिस्टंट मेकअप मॅन म्हणून काम केले आहे. "परफेक्ट प्लॅन" या हिंदी चित्रपटातही मेकअप आर्टिस्ट म्हणून काम केले. ५० ते ६० लघुचित्रपटाचे काम केले. १० ते १५ पूर्ण चित्रपटात वैयक्तिक मेकअप आर्टिस्ट म्हणून काम केले आहे. १५० पेक्षाही अधिक अल्बम साँगचे मेकअपचे काम आदित्यने केले आहे. तेव्हापासून तर आतापर्यत त्यांचा मेकअप आर्टिस्ट म्हणून अखंड प्रवास सुरु आहे.

दिग्दर्शक सांगेल, कॅमेरामन सूचित करेल त्याप्रमाणे चेहरा रंगवायचा असतो अर्थात मेकअप करायचा असतो. त्यानुसार चित्रीकरण पूर्ण होईपर्यंत मेकअप मॅनचे काम सुरूच असते. मेकअप करताना दर्जेदारच साहित्य वापरावे लागते. त्यासाठी ते तडजोड अजिबात करत नाही. चित्रपट क्षेत्रात वापरले जाणारे, लागणारे मेकअपचे साहित्य आदित्य वापरतो. प्रकाश योजनेनुसार स्किन टोन मेकअप करावा लागतो. संवाद असणाऱ्या सर्वच कलाकारांचा मेकअप त्यांच्या भूमिकेनुसार करावा लागतो. कलाकारांच्या संख्येनुसार मेकअपसाठी कुशल मनुष्यबळ लागते. दिग्दर्शक, कॅमेरामन, लाईटमन यांच्या समनव्ययातून मेकअप मॅनला काम करावे लागत असल्याचे आदित्यने सांगितले. आजपर्यंत अनेक प्रसिद्ध कलावंतांचे मेकअप केल्याचेही आदित्यने सांगितले. मेकअपचे काम करताना अनेक छोट्या-मोठया कलाकारांशी संबंध येतो. त्यामुळे ॲडीने या क्षेत्रात स्वतःची चांगली ओळख निर्माण केली आहे. मेकअपसाठी लागणारी उत्पादने सतत नवनवीन, अधिकाधिक दर्जेदार येत असतात. मागणी, गरजेनुसार त्यांचा वापर मेकअप मॅनला करावा लागतो. प्रोस्टेडीक मेकअप करताना कसब पणाला लागते. आदित्य सर्व प्रकारचे मेकअप करण्यात पटाईत आहे. नाशिक नगरीत त्याच्यासारखा गुणी मेकअप आर्टिस्ट असल्याने त्याला या कामासाठी पंचक्रोशीतून मागणी असते. या क्षेत्रात करिअर आहे; पण त्यासाठी संयम हवा असल्याचे आदित्यने सांगितले. आवडीशिवाय कोणतंही क्षेत्र निवडू नये, असा संदेशही त्याने तरुणाईलादिला.

## ➤ महत्त्वाचे

### कांद्याच्या ढिगाऱ्याखाली सापडलेली सोन्याची पोत मालकाला केली परत



**मनमाड ।** सध्या प्रामाणिकपणा काही प्रमाणात हरवल्याची दिसून येत असतानाच काही प्रमाणात प्रामाणिक लोकं सुद्धा असल्याचे उदाहरण येथील बाजार समिती पहायला मिळाले. मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचा लिलाव सुरू असताना कांद्याच्या ढिगाऱ्याखाली सापडलेली सोन्याची पोत बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांनी मालकाला प्रामाणिकपणे परत केली. या घटनेने बाजार समितीतील कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा दिसून आला असून त्यांच्या या कृतीचे कौतुक होत आहे. धनेर येथील शेतकरी रामदास जाधव कांदा विक्रीसाठी मनमाड बाजार समितीत आले होते. दररोजप्रमाणे त्यांनी गाडी बाजार आवारात उभी केली. लिलावप्रक्रिया सुरू झाली असताना व्यापारी माल पाहत होते आणि कर्मचारी गाडीतील मागील फाळके काढून ढिगाऱ्यातील कांदा वर काढण्याचे काम करत होते, जेणेकरून मालाची गुणवत्ता तपासता येईल.याच वेळी कर्मचारी गणेश आहेर, कैलास आव्हाड, बाळू पवार आणि संतोष नगरे यांना कांद्याच्या ढिगाऱ्यात काहीतरी झळकताना दिसले. बारकाईने पाहणी केली असता ती एक सोन्याची पोत असल्याचे लक्षात आले.पोत कुणाची आहे याची शहानिशा सुरू झाली. रामदास जाधव यांना विचारले असता त्यांनी त्वरित आपल्या घरी संपर्क साधला. त्यांच्या कुटुंबातील महिलांनी पोत हरवल्याची कबुली दिली. तीच पोत बाजार समितीत सापडल्याचे स्पष्ट झाल्यानंतर रामदास जाधव यांना ती सुपूर्त करण्यात आली. कोणताही मोह न ठेवता कर्मचाऱ्यांनी पोत परत दिल्यामुळे त्यांच्या प्रामाणिक वर्तणुकीची चर्चा परिसरात सुरू झाली आहे.

### आयएमए नाशिक शाखेचा योग संगम उपक्रमात सहभाग

नाशिक- इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नाशिक शाखेने आंतरराष्ट्रीय योग




दिनानिमित्त देश पातळीवर राबविलेल्या 'योग संगम' उपक्रमात सहभाग घेतला. याअंतर्गत संघटनेच्या सदस्य डॉक्टर व त्यांच्या कुटुंबियांनी शालिमार येथील आयएमए सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात सहभागी होताना योगाभ्यास केला. योगशिक्षक डॉ.अमित धांडे,सहशिक्षिका डॉ. अनु वाघचौरे आणि सहशिक्षिका अर्चना जोशी ह्यांनी योगाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ.निलेश निकम, सचिव डॉ.मनिषा जगताप, खजिनदार डॉ.अनिता भामरे, उपाध्यक्ष डॉ.प्रेरणा शिंदे, उपसचिव डॉ.शलाखा बागूल यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रमाचे समन्वय आणि सूत्रसंचालन डॉ.पंकज चव्हाण ह्यांनि केले. कार्यक्रमादरम्यान योगाचा इतिहास, योगाचे दैनंदिन जीवनात मानसिक, शारीरीक फायदे सांगितले गेले. रुग्णसेवा बजावत असताना काही वेळा डॉक्टरांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परंतु नियमितपणे योगासने करताना सुदृढ राहता येऊ शकते. यावेळी वेगवेगळ्या प्रकारची आसने करताना, त्याचे फायदे विशद करण्यात आले. त्यामुळे सर्वांनी योगासनांचा सराव करण्याचा सल्ला देण्यात आला. प्रारंभी डॉ निलेश निकम ह्यांनी अध्यक्षिय मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्वांचे आभार डॉ.मनिषा जगताप यांनी मानले. ह्या उपक्रमाची पोचपावती म्हणून आयएमए नाशिक शाखेला भारत सरकारतर्फे प्रमाणपत्रही मिळाले.

### कणकापूरच्या ग्रामसेविका जयश्री आहेर यांची प्रशासकीय बदली

**देवळा ।** ग्रुप ग्रामपंचायत कनकापूर कांचने येथील ग्रामविकास अधिकारी जयश्री आहेर यांची



बदली झाल्याने गावाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात येऊन निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या कारकीर्दीत गावाला हागणदारी मुक्त व ओडिओ प्लस गाव, हर घर जल करून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्कार, तंटामुक्त, आबासाहेब खेडकर स्मृती पुरस्कार, स्मार्ट ग्राम पुरस्कार, उत्कृष्ट गृह संकुल पुरस्कार मुख्यमंत्री यांच्या हस्ते तसेच अटल भूजल योजना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी केलेली गावाची सेवा गावाला मिळवून दिलेले यश नेहमी गावाच्या स्मरणात राहील. सरपंच बारकू वाघ यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तर त्यांच्या जागी बदलून आलेल्या ग्रामसेवक सरिता मिस्तरी यांचे स्वागत उपसरपंच जगदीश शिंदे यांनी केले. याप्रसंगी माजी उपसरपंच तुषार शिंदे, शिवाजी बर्वे, कडू शिंदे, योगेश शिंदे, सुधाकर शिंदे, साहेबराव मोरे, चिंतामण बच्छाव, बाळू शिंदे, अरुण शिंदे, प्रवीण शिंदे, नितीन शिंदे, जयदीप शिंदे, समाधान पवार, दिंगबर सोनवणे आदी ग्रामस्थ, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## २०१७ प्रमाणेच चार सदस्यीय प्रभाग रचना कायम ठेवावी; अल्पसंख्याक, एससी-एसटी प्रभागांची तोडफोड खपवून घेतली जाणार नाही

# प्रभाग रचनेत राजकीय हस्तक्षेप नको

### वंचित बहुजन आघाडीची आयुक्तांकडे ठाम मागणी

**नाशिक ।** प्रभाग रचना करताना कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होऊ देऊ नये, तसेच २०१७ प्रमाणेच चार सदस्यीय प्रभाग रचना कायम ठेवावी, अशी आग्रही मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे करण्यात आली. अल्पसंख्याक, अनुसूचित जाती व जमातींच्या प्रभागांची तोडफोड होणार नाही याची दक्षता घ्या, अन्यथा त्याचे परिणाम मनपा प्रशासनास भोगावे लागतील, असा इशाराही महानगराध्यक्ष अविनाश शिंदे यांनी निवेदनातून दिला.



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असताना नाशिक महापालिकेच्या प्रभाग रचनेवर पुन्हा राजकीय हस्तक्षेपाचे सावट दिसून येत आहे. २०१७ मध्ये करण्यात आलेली प्रभाग रचना राज्य शासनाच्या निकषांनुसार व २०११ च्या जनगणनेच्या आधारे झाली होती. त्या रचनेत वस्ती, समाजघटक आणि लोकसंख्येचा योग्य समतोल राखण्यात आला होता. मात्र सध्याच्या घडामोडी पाहता, काही राजकीय हितसंबंधातून प्रभाग रचना बिघडवण्याचा प्रयत्न सुरू असून विशेषतः अलिकडेच काही नेत्यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या दबावामुळे एससी, एसटी आणि अल्पसंख्याक प्रभागांचे कृत्रिम विभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही शिंदे यांनी म्हटले आहे. राजकीय फायद्यासाठी समाजघटकांचे मतविभाजन करण्याचा प्रयत्न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र विरोध केला जाईल. शासन व निवडणूक आयोगाच्या निकषांना डावलून जर राजकीय दबावाखाली प्रभाग रचना झाली, तर जनतेत तीव्र उद्रेक होईल, यास संपूर्णपणे महापालिका व जिल्हा प्रशासनच जबाबदार असेल, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. प्रभाग रचनेवर नाशिकमधील आमदार व खासदारांचा अप्रत्यक्ष दबाव असल्याची शक्यता वर्तवून प्रशासनाने अशा दबावांना बळी न पडता पारदर्शक व न्यायिक प्रक्रिया अवलंबावी, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.हे निवेदन सादर करताना वंचित बहुजन आघाडीचे युवक राज्य प्रदेश सदस्य चेतन गांगुर्डे, उपमहानगर प्रमुख सुनील साळवे, उपजिल्हाध्यक्ष तुकाराम मोजड, युवक महासचिव शहर दीपक पगारे, राहुल पटेकर, राजू गोतीस, विश्वनाथ भालेराव, सुरज गांगुर्डे, विशाल हिवराळे, युवराज मनेरे, रवी पगारे, शहराध्यक्ष युवक अतुल जाधव, करण दाभाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## विंचूरला दुकानादाराचे दुकानापुढे वस्तूचे अतिक्रमण; गुन्हा दाखल

**विंचूर ।** येथील रहदारी असलेल्या रस्त्यावर होणाऱ्या अतिक्रमण बाबत वेळोवेळी लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने पथक काढून कडक सूचना देण्यात आल्या परंतु मारवाडी पेठ, तसेच बाजार गल्ली, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयालगत रोड, ग्रामपालिकेजवळ व श्रीराम चौक या रस्त्यावरील मोटरसायकलचे व चारचाकीच्या अतिक्रमणात कायम वाढतच आहे.

दि.२४ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मारवाडी पेठ येथील भोलेहर जनरल स्टोअरचे दुकानासमोर, रस्त्यावर जनरल स्टोअरच्या दुकानाबाहेर रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅग व रस्त्यावर ठेवलेले दुकानातील विक्रीचे साहित्य लासलगाव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दुकानात घेण्यास सांगितले असता, आरोपी १) शंकरलाल मिस्त्रीलाल सोनी, २) दिलीप मिस्त्रीलाल सोनी, ३) भाग्येश दिलीप सोनी, ४) जयेश बाबुलाल सोनी यांनी संगणमत करून सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने आरडा ओरडा करून पोलीस पथकावर अवाश्च भाषेचा वापर करून लोकांची गर्दी जमवून दुकानाबाहेर रहदारीचा अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅगा काढून घेण्यास नकार देऊन, पोलिसांचे कायदेशीर आदेशाचे पालन करण्या स्पष्टपणे नकार देऊन अवज्ञा केली. म्हणून लासलगाव पोलीस ठाणे येथे गुरनं- १५७/२०२५ भा.न्या.सं. कलम २२१, २२३, २८५ सह मु. पो.का. कलम १०२, ११२, ११७ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कांदळकर करीत आहे.

## गुरुवारी संदीप जगताप यांच्या कविता मंत्रालयात...

**पिंपळगाव बसवंत ।** चिंचखेड ता. दिंडोरी येथील प्रसिद्ध कवी व व्याख्याते संदीप जगताप यांचा "कविता आणि बरच काही " हा कवितांचा कार्यक्रम मंत्रालय अधिकारी, कर्मचारी कल्याण मंच यांच्यावतीने मंत्रालयात मुंबई येथे गुरुवार दि.26 जून रोजी आयोजित केला आहे.



शेतकरी चळवळीतील बुलंद आवाज, शेतकऱ्यांच्या सुखदुःखाची प्रभावी मांडणी व प्रबोधनाचे खणखणीत विचार यामुळे संदीप जगताप यांच्या कविता महाराष्ट्रातल्या रसिकांच्या काळजापर्यंत पोहोचल्या आहे. आयुष्य करायचं असेल हिरवागार तर पोरी शेतकरी पोराशी लग्न कर.. या कवितेने तर सध्या महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण ढवळून काढले आहे. लग्न न होणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची वास्तव स्थिती लिहून मुलींच्या डोळ्यात अंजन घालणारी ही कविता प्रसार माध्यमातून प्रचंड व्हायरल झाली. या कवितेने समाजमन बदलण्याचे काम सुरू केले. शेतीकडे बघण्याचा निकष दृष्टिकोन सकारात्मक होऊ लागला. या कवितेच्या परिणामामुळे अनेक मुली शेतकरी मुलाशी लग्न करायला तयार झाल्या. व असे विवाह घडून आले. यामुळे संदीप जगताप यांच्याकडे लोक समाज सुधारक कवी म्हणून बघू लागले आहे. गेले अनेक वर्ष शेतकरी सर्वसामान्य माणसाची बाजू घेऊन संदीप जगताप यांच्या कवितेने व्यवस्थेवर नेहमीच आसूड ओढले. पुरस्कार मिळण्यापेक्षा वावरातल्या पिकाला भाव मिळाला पाहिजे. अशा भूमिकेतून त्यांनी लेखन केले यामुळे वयोवृद्ध पासून तरुण मुलांपर्यंत संदीप जगताप हा सगळ्यांचा आवडता कवी झाला आहे. महाराष्ट्रात त्यांचा मोठा रसिक वर्ग आहे आणि तो अगदी व्यवस्थेत काम करणाऱ्या मंत्रालयात देखील असल्यामुळे गुरुवारी संदीप जगताप यांचा स्वतंत्र कार्यक्रम मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी मंचने आयोजित केला आहे. यास वरिष्ठ अधिकारी व मंत्रालयातील कर्मचारी उपस्थित राहणार आहे.

## दावचवाडी शिवारात तिहेरी अपघात : नवविवाहित युवकाचा जागीच मृत्यू

**पिंपळगाव बसवंत ।** निफाड तालुक्यात सकाळी दावचवाडी शिवारात भीषण तिहेरी अपघात झाला. मोटरसायकल, एसटी बस आणि कार यांच्यात झालेल्या या अपघातात पचकेश्वर येथील २९ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघाताची नोंद पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात करण्यात आली.

मृत युवकाचे नाव संतोष गोविंद घोरपडे (वय २९, रा. पचकेश्वर, ता. निफाड) असे आहे. तो पचकेश्वर गावाहून कामानिमित्त पिंपळगाव बसवंतकडे येत असताना हा अपघात दावचवाडी शिवारात झाला. घटनेच्या वेळेस एमएच ०७ सी ९१०५ क्रमांकाची एसटी बस दावाचवाडीकडून पिंपळगावकडे, तर एक कार (एम.एच.क्रमांक) पिंपळगाव बसवंतकडून निफाडच्या दिशेने येत होती. संतोष घोरपडे आपल्या एमएच १५ एचडब्ल्यू ६२७० क्रमांकाच्या मोटरसायकलवर होता. तेव्हा दावचवाडी शिवारात बस ओव्हरटेक करत असताना संतोष यांच्या मोटरसायकलला समोरून येणाऱ्या कारने जोरदार धडक दिली. कारच्या धडकेने मोटरसायकल असंतुलित होऊन थेट बसच्या चाकाखाली गेली. या भीषण धडकेत संतोष घोरपडे यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात संतोष यांचे डोके व शरीराचा काही भाग बसच्या चाकाखाली आल्याने त्याचा मृत्यू अत्यंत हृदयद्रावक झाला. परिसरात या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.



संतोष यांचे वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते. त्यांच्या मागे पत्नी, आठ महिन्यांचा मुलगा, आई-वडील व दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण पचकेश्वर गाव शोकसागरात बुडाला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार चंद्रकांत निकम, शुभमउगले करत आहेत.

## सहा वर्षीय मुलीचा खून करून पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

**एकलहरे ।** उपनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. आत्महत्याच कारण अद्याप समजू शकले नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की उपनगर पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेल्या स्वप्निल गायकवाड (वय ३४) यांनी आपल्या सहा वर्षाची मुलगी भैरवीला गळफास देत तिचा खून करून गळफास घेत आत्महत्या करून स्वतःचे जीवन संपवले.याबाबत पोलिसांनी सांगितले की, काही दिवसापूर्वी पोलिस अंमलदार स्वप्निल गायकवाड याचे पत्नीसोबत वाद होत असल्याने त्यांनी घटस्फोट घेतला होता. नाशिक रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे व अधिकारी, कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

## बनावट लिंकद्वारे दिंडोरीतील शेतकऱ्याला दहा हजाराला गंडवले

**दिंडोरी ।** पीएम खात्याच्या बनावट लिंकेने दिंडोरी येथील एका शेतकर्याच्या खात्यावरुन अज्ञात व्यक्तीने पैसे काढून घेतल्याची घटना घडल्याने शेतकर्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दिंडोरी येथील शेतकरी शांताराम जाधव यांच्या पोस्टातील खात्यावर अनेक दिवसांपासून पीएम योजनेंचे पैसे येत होते. परंतू त्यांच्या मोबाईलवर पीएम खात्याच्या बनावट लिंक आल्यावर त्यांनी ती ओपन करताच त्यांच्या पोस्टातील खात्यावरुन दहा हजार रुपये अज्ञात इसमाने उडवले. याबाबत त्यांनी तत्काळ पोस्ट कार्यालयात जावून आपले खाते बंद करण्याची मागणी केली. त्यावेळी पोस्टातील कर्मचार्यांनी तत्काळ खाते बंद करुन जाधव यांना फसवणुकीपासून वाचविले. परंतू त्यांना दहा हजार रुपयाचा आर्थिक फटका बसला आहे. जाधव यांचे खाते बंद केले असले तरी त्यांच्या मोबाईलवर वेगवेगळे मॅजेस सुरु आहे. त्यामुळे या शेतकर्यांमध्ये वेगळे संभ्रम निर्माण होत आहे. तरी शासनाने याची दखल घेवून बनावट लिंकवर कायदेशिर कारवाई करण्याची मागणी जाधव शेतकरी कुटूंबियांनी केली आहे. तसेच आधी पोलिस प्रशासनाकडून अनेक वेळा शेतकर्यांना या बनावट लिंकव्दारे माहीती व व्हिडीओ शेअर करुन शेतकर्यांना बनावट लिंक डाऊनलोड करु नये, असे आवाहन करण्यात आले होते. तरी काही शेतकर्यांकडून चुकून ही लिंक डाऊनलोड होत आहे. त्यामुळे अनेक शेतकर्यांची या बनावट लिंकव्दारे लुट होण्याचे प्रकार वाढत चालले आहे. तरी या बनावट लिंकचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.

## डॉ. जयश्री जाधव-कदम यांनी मिळविले पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयात यश

**नाशिक ।** येथील विद्यार्थीप्रिय शिक्षिका प्रा.जयश्री जाधव - कदम यांनी पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयात पदवी मिळविली. वयाच्या ५५ व्या वर्षी ही पदवी त्यांनी प्राप्त केली. मविप्र समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्या कार्यरत आहेत.

एकूण २२ वर्षापासून वरिष्ठ महाविद्यालयात त्यांचे अध्यापन सुरु आहे. त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पीएच.डी पदवी संशोधक मार्गदर्शक असून अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याने त्यांनी पीएच.डी पदवी प्राप्त केली आहे. अनेकांनी पेटंट प्राप्त केले आहेत. त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीचे सदस्य आहेत. त्यांनी महाविद्यालयाच्या विविध समित्यांमध्ये जबाबदारीने काम पूर्ण केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील राहणे त्यांना आवडते. सांस्कृतिक समिती प्रमुख म्हणून काम करताना महाविद्यालयाला आतापर्यंत अनेक बक्षिसे प्राप्त करून दिली आहेत. आतापर्यंत विविध स्वरूपाचे एकूण ०८ पुरस्कार प्राप्त केले आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात त्या नेहमी पुढाकार घेतात. २०२२-२३ मध्ये दिल्ली येथे पार्लमेंट मध्ये प्रत्यक्ष बजेट सादर होते,



त्यासाठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सहलीचे आयोजन त्यांनी केले होते. २०२४-२५ मध्ये भारतीय रिझर्व बँक मुंबई येथे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. अनेक महाविद्यालयांमध्ये विविध विषयांवर त्या मार्गदर्शन करतात. महिला दिनानिमित्ताने खास करून महिला सबलीकरणावर मार्गदर्शन करतात. बचत गटांनाही त्या मार्गदर्शन करतात. आत्तापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ४० पेक्षा अधिक संशोधन पेपर वाचन आणि प्रकाशित झाले आहेत. महाविद्यालयामध्ये दरवर्षी गरीब विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत त्या करतात. विविध वृत्तपत्रांमध्ये २५० पेक्षा अधिक लेख प्रसिद्ध झाले असून अर्थशास्त्रातील पुस्तक व संदर्भ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. नोकरी करत असतांना त्यांनी हे यश मिळविल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अशोका हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या २५ मिनी मली इन्वेंसीव्ह कार्डियाक सर्जरी पूर्ण

**नाशिक ।** अशोका मेडिकल हॉस्पिटलमध्ये कार्डिओ व्हॅस्क्युलर व थोरासिक सर्जन डॉ. प्रणव माळी यांनी मिनी मली इन्वेंसीव्ह कार्डियक सर्जरी या अत्याधुनिक शस्त्रक्रियेचा यशस्वी टप्पा पूर्ण करत २५ रुग्णांवर यशस्वी सर्जरी केली. या यशाचा सन्मान करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमात हॉस्पिटलच्या विविध विभागांचे मान्यवर, कार्डिओलॉजी टीम तसेच शस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या रुग्णांनी सहभाग घेतला. यावेळी डॉ. प्रणव माळी यांनी सर्जरी विषयी माहिती देताना सांगितले की, ही पद्धत पारंपारिक ओपन हार्ट सर्जरीच्या तुलनेत खूपच फायदेशीर आहे. यात छातीत फक्त लहान चिरा घेऊन शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे वेदना कमी, रक्तस्राव कमी आणि रुग्ण लवकर बरा होतो. ही पद्धत प्रौढांबरोबरच मुलांनाही लागू शकते. विशेष म्हणजे, अशा पद्धतीने केलेले सर्वात लहान बाळ केवळ दीड वर्षाचे होते. ज्याचे वजन नऊ किलो होते. या शस्त्रक्रियेचे दाग दिसत नाहीत. त्यामुळे सौंदर्याच्या दृष्टीने ही पद्धत अधिक चांगली मानली जाते. बायपास सर्जरी, वॉल रिप्लेसमेंट आणि वॉल रिपेअर सर्जरी साठीही ही पद्धत प्रभावी ठरते. विशेषतः लहान मुलांमध्ये हृदय दोषांची दुरुस्ती देखील अत्यल्प वेदनांनी शक्य होते.

या विशेष कामगिरीमध्ये अशोका मेरी कवर हॉस्पिटलचे ज्येष्ठ भूलतज्ज्ञ डॉ. संदीप भंगाळे, डॉ. शर्वरी माळी आणि डॉ. मंदार गलांडे यांचे विषय सहकार्य लाभले, ज्यामुळे ही सर्जिकल प्रक्रिया अधिक सुरक्षित व परिणामकारक ठरली. यावेळी हॉस्पिटलचे रिजनल डायरेक्टर नीरजलाल यांनी सांगितले की, अशोका मेडिकलवर हॉस्पिटल हे उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे व सर्वाधिक तांत्रिकदृष्ट्या सुसज्य वैद्यकीय केंद्र आहे. तेथे अत्याधुनिक उपकरणासह तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विविध हृदय विकारावरील उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातात. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अशोका मेडिकल हॉस्पिटलमध्ये हृदयाशी संबंधित प्रक्रिया व शस्त्रक्रिया जसे की, अँजिओग्राफी, एनजीओप्लास्टी, बायपास सर्जरी, वाल्व रिप्लेसमेंट या गरजू रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत केल्या जातात. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हॉस्पिटलचे मार्केटिंग हेड शिवकुमार रोहाडे यांनी केले. तसेच केंद्रप्रमुख अनुप त्रिपाठी यांनी कार्यक्रमाला आलेल्या सर्व मान्यवरांचे, रुग्णांचे तसेच उपस्थित पत्रकारांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केले.

